# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १ वा ❑ रविवार दि.०२ मार्च २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## इतकी क्रूरता येते कुठून..

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

स्त्रियांवरील, लहान मुलींवरील व वृद्धांच्या वाढत्या अत्याचाराने समाजमन सुन्न झाले आहे. महिलांच्या अत्याचार कमी न होता दिवसेंदिवस वाढत आहे..ज्या निर्दयीपणे, क्रूरतेने अत्याचार होत आहे, इतकी करता येते कुठून हा प्रश्न आ वासून उभा ठाकला आहे. पुण्यातील शिवशाही बसमधील २६ वर्षाच्या तरुणीवर बलात्कार एका नराधमाने करून आपल्या क्रूरतेचा परिचय दिला. प्रकरण ताजे असतानाच मध्यप्रदेश मध्ये एका ५ वर्षीय चिमुरडीवर तिच्या शेजारी राहणाऱ्या किशोरवयीन आरोपीने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना आली आहे. पीडित मुलीवर ग्वाल्हेरच्या एका रुग्णालयात उपचार सुरू आहेत. येथे ती मृत्यूशी झुंज देत आहे. या अल्पवयीन पीडितेला शरिरातील अंतर्गत अवयवांना जखमा, चावल्याच्या, डोके भिंतीवर आपटल्याच्या याबरोबरच गुप्तांगाला २८ टाके अशा अनेक जखमा असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पीडित मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या कुटुंबियांनी दिली होती आणि त्यानंतर दोन तासांनी ती आढळून आली. तिच्या घरापासून जवळच एका बंद पडलेल्या घराच्या छतावर ही मुलगी बेशुद्ध आणि रक्तस्त्राव झालेल्या अवस्थेत आढळून आली.

समाजाला आत्मपरीक्षण करायला लावणाऱ्या या घटना आहेत. ज्या ज्या वेळी निर्दयी व क्रूर लोक असे भयानक गुन्हे करत जातील त्यावेळी पालक, समाज या सर्वांची जबाबदारी नेमकी काय, मुलांना कशा पद्धतीने घडवता येईल. याचा विचार करून त्यावर भर देण्याची गरज आहे. समाज म्हणून, पालक म्हणून मुलांना चांगले वळण लावण्यासाठी किंवा माणूस म्हणून समाजात त्यांना आपले स्थान निश्चित करण्यासाठी काय करावे लागेल, याचा विचार सर्वांनाच करावा लागणार आहे. मुलांना चांगले संस्कार, त्यांना सक्षम व मजबूत मानसिकता प्राप्त होईल अशा पद्धतीने, त्यांच्याशी वेळोवेळी संवाद साधणे, मुलगा, मुलगी असा भेदभाव न करता सर्वांना समाजात जगण्यासाठी काय आवश्यक आहे, स्वतंत्रपणे जगता येते, स्वावलंबी होऊन जगता येते, कुठल्याही प्रसंगाला समोर जाण्याचे धारिष्ट त्यांच्या अंगात भिनवणे अशा गोष्टी पालक म्हणून समाज म्हणून सर्वांना कराव्या लागतील. तरच कुठ तरी अत्याचाराला पायबंद बसेल. समाजशास्त्रीय व मनोवैज्ञानिक दृष्टिकोनातून त्याकडे बघितले जाणे व त्यावर मंथन होणे म्हणूनच गरजेचे ठरते. कोलकाता, पुण्यातील बलात्कार प्रकरण, मध्य प्रदेश मधील लहान मुलींवरील अमानुष अत्याचार व साधा स्वयंपाक उशिरा केला म्हणून हिंगोली जिल्ह्यातील सवना येथे ८० वर्षांच्या कुंडलिक शिवराम नायक नामक ज्येष्ठ नागरिकाने आपल्या ७८ वर्षीय वयोवृद्ध पत्नीचे हातपाय बांधून तिला रॉकेल ओतून जिवंत जाळल्याच्या प्रकाराकडे याचसंदर्भाने बघता यावे.



## नांदेडमध्ये ज्येष्ठ गझलकारा सुधाताई नरवाडकर यांच्या गझलसंग्रहाचे प्रकाशन

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**नांदेड** – जुन्या पिढीतील ज्येष्ठ साहित्यिक बी. रघुनाथ यांच्या कन्या तथा मराठवाड्यातील गझलकारा श्रीमती सुधाताई नरवाडकर यांच्या नवीन गझलसंग्रहाचे प्रकाशन ३ मार्च सोमवार रोजी एका सोहळ्यामध्ये पार पडणार आहे. पी. आर. ग्रुप ऑफ पब्लिकेशन, मुंबई यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला मराठी गझलेच्या क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचा सहभाग असणार आहे.

हा प्रकाशन सोहळा ३ मार्च २०२५ सोमवार रोजी सायंकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत नांदेड येथील विसावा पॅलेस, शिवाजीनगर येथे संपन्न होईल.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ गझलकार श्री. बापु दासरी (सेवानिवृत्त कल्याण अधिकारी, नांदेड) हे असतील, तर प्रमुख पाहुणे म्हणून इंजिनियर प्रविण पुजारी ( महाराष्ट्रातील ख्यातकीर्त गझलकार, कोल्हापूर ) उपस्थित राहणार आहेत. तसेच, या विशेष सोहळ्यास ह. भ. प. डॉ. शंतनु महाराज माळी (रसे), ता. वरुड, जि. अमरावती यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

साहित्यरसिक, गझलप्रेमी आणि सुधाताई नरवाडकर यांच्या चाहत्यांसाठी हा सोहळा आनंददायी ठरणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन इंजि. पद्मजा आतुलकर, डॉ. मंगेश नरवाडकर, इंजि. स्वाती नरवाडकर, डॉ. राजेश नरवाडकर आणि संपूर्ण नरवाडकर परिवार यांनी केले आहे.

# साहित्याचा ताल बिघडला; साहित्य रसिकांच्या पदरी रिकामा कटोरा

## संमेलन व्यवस्थेचे पानिपत








ज्योतिर्मय 📖 साहित्य

''दिल्ली बहुत दूर है !, ''हा प्रचलित वाक्प्रचार आपल्या सर्वांना माहित आहे. यंदाचे संमेलन दिल्लीला ठरल्यावर तर हे वाक्य बरेच चर्चेत आले.ज्यांना संमेलनाचे निमंत्रण आले नाही, अशांसाठी हा वाक्प्रचार बरोबर ठरला होता. या बहुचर्चित वाक्याचा खोलात जावून शोध घेतला असता रंजक माहिती समोर आली. ''इनुज दिल्ली दूर अस्त'', असा वाक्प्रचार उर्दूत आहे. याचा अर्थ दिल्ली अभी बहुत दूर है!

चिश्ती संप्रदायाचे एक सुफी संत हजरत निजामोद्दिन औलिया यांनी या वाक्याचा सर्वात प्रथम उल्लेख केला होता. त्या नंतर कित्येक वर्षांनी अखेरचा मुगल सम्राट बहादुर शाह जफर यांनी केला होता.

जेव्हा ईस्ट इंडीया कंपनीने एका मागोमाग एक भारतीय संस्थानं काबीज करायला सुरुवात केली होती, आणि आपला मोर्चा दिल्लीकडे वळवला तेव्हा बहादूर शाहने ब्रिटीशांना उध्देशुन हे वाक्य म्हणले होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांची गाजलेली घोषणा ''चलो दिल्ली '' ही घोषणा म्हणजे हिंदुस्थानला ब्रिटीश राजवटीतून मुक्त करण्याचे हे आवाहन होते. जयवंतराव टिळक (अशी ही दिल्ली), गंगाधर इंदुरकर (दिल्ली दिनांक) अशोक जैन (राजधानीतून) अशी पुस्तकेही आपल्याला माहित आहेत. दिल्लीचा दरबारही आपल्याला माहित आहे. दिल्लूचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा हे ही आपल्याला माहित आहे,अशा या दिल्लीत यंदाचे ९८ वे अ.भा.मराठी साहित्य संमेलन गाजले आणि वाजले.

> देशाच्या राजधानीत झालेल्या साहित्य संमेलनाच्या दरबारी अनेक साहित्य रसिकांनी हजेरी लावली खरी; पण मराठी जनांच्या उदंड उत्साहाने संयोजन व्यवस्थेचे बारा वाजले, दुरावस्था, गैरसोयीने सर हद्द पार केली. त्यामुळे अनेकजन उद्घाटन समारंभास दांडी मारून पर्यटनास गेले. दिल्लीच्या तालकटोरा स्टेडीयमवरील छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरीत शुक्रवार दि.२१, फेब्रूवारी रोजी ग्रंथदिंडीने शानदार सुरूवात झाली; मात्र यात देशभरातून सहभागी झालेल्या साहित्य रसिकांना गैरसोयीचा पहिल्याच दिवशी सामना करावा लागला. संमेलनाचे ओळखपत्र मिळण्यापासून ते भोजनव्यवस्थेची सोय होण्या पर्यंत अनेकांच्या नाकात दम आला, पावलोपावली झगडावे लागले.तर काही वेळा कार्यकर्त्यांशी हमरी–तुमरीही झाली.

संमेलनाची अधिकृत निमंत्रण पत्रिका साहित्य महामंडळाने संमेलनाच्या केवळ आठ दिवस आधी जाहीर केली, तो पर्यंत सरहद्द या आयोजक संस्थेने संमेलन पूर्व दोन कार्यक्रम दिल्लीत घेतले आणि दोन कार्यक्रम पुण्यात घेतले होते.इतर ठिकाणीही कार्यक्रमही सुरुच होते. यातीलच कार्यक्रम म्हणजे उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेला महादजी शिंदे पुरस्कार. तो वादात सापडला. साहित्य संमेलन समारोप सत्रातील एका मुलाखतीत विधान परिषदेच्या उप सभापती नीलम गो–हे यांनी उबाठा शिवसेनेवर, साहित्य महामंडळावर टीका केली. खळबळजनक वक्तव्य करून वाद निर्माण केला. प्रत्यक्ष निमंत्रण पत्रिका, कार्यक्रमाचे स्वरूप आणि त्यात सहभागी वक्ते पाहून पत्रिकेचा दर्जा अनेकांच्या लक्षात आला. यात साहित्यिकांपेक्षा राजकीय व्यक्तींचा मोठा प्रभाव दिसुन आला. महामंडळ पदाधिका–यांनी आपल्या हित संबंधातील लोकांना पत्रिकेत स्थान दिले. या मुळे नको ती माणसं मोठी झाली. साहित्यबाह्य विषयांना अधिक प्राधान्य दिले. त्यामुळे साहित्य संमेलनातील साहित्य गायब झाले. संसदभवन परिसरातून सकाळी ग्रंथ दिंडी काढण्यात आली, तिचा समारोप ताल कटोरा स्टेडीयमवर झाला.यात साहित्य रसिकांचा उस्ताह उदंड होता. संमेलनाध्यक्षा डॉ.ताराबाई भवाळकर, महामंडळ अध्यक्षा उषा तांबे, आयोजक संजय नहार यांच्यासह अन्य पदाधिकारी हजर होते.

साहित्य संमेलनाच्या इतिहासात पहिल्यांदा एकाच संमेलनाचे दोनदा उद्घाटन करण्याचा प्रसंग घडला. पहिल्या सत्रात विज्ञान भवन मध्ये दि. २१ रोजी दुपारी चार वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होते, त्यामुळे कडेकोट सुरक्षा व्यवस्था होती, मोजक्या निमंत्रितांना प्रवेश होता. व्यासपीठावरची संख्या ही केवळ मर्यादित होती. याचा फटका ९७ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलाचे विद्यमान अध्यक्ष डॉ.रवींद्र शोभणे यांनाच बसला. मात्र विज्ञानभवन मधील पहिले सत्र गाजवले ते पंतप्रधान मोदी यांच्या उद्घाटन भाषणाणे, आणि संमेलनाध्यक्षा डॉ.तारा भवाळकर यांनी मांडलेले हृदयस्पर्शी मनोगतही गाजले. त्यांनी आपले सविस्तर अध्यक्षीय भाषण दुस–या सत्रात मांडले. पण सर्वाधिक गाजले ते पहिल्या सत्रातील त्यांचे मनोगत.

या वेळी सादर करण्यात आलेले मराठवाड्यातील पहिल्या महिला संगीतकार आनंदी विकास यांनी संगीतबध्द केलेले आम्ही असु अभिजात, हे संमेलन गीत, तसेच काश्मिरी कन्या शमीमा अख्तर हीने सादर केलेले महाराष्ट्रगीत आणि पसायदान उल्लेखनिय असेच होते. शमिमा ही काश्मिरची विद्यार्थिनी. शिक्षणासाठी पुण्यात आली.धर्म, भाषा, पंथ यांच्या सरहद्दी तोडून मराठी भाषेत आणि मातीत रूजली. तिने गायलेली कित्येक मराठी गाणी भजनं महाराष्ट्रासह काश्मिर व दिल्लीतही ऐकायला मिळतात.

नंतरचे दुसरे उद्घाटन सत्र ताल कटोरा स्टेडियमवर नियोजित वेळेपेक्षा उशिरा म्हणजे सायंकाळी साडे सात वाजता सुरू झाले.ते रात्री दहा वाजता संपले.त्या मुळे पहिल्या दिवशी म्हणजे दि.२१ रोजी सायंकाळी साडेसात वाजता होणारे नियोजित मुख्य कवी संमेलन दुसरे दिवशी सकाळी दहा वाजता सुरु झाले. अध्यक्ष होते कवी इंद्रजित भालेराव, त्यांना परत जाण्याची घाई होती. काही कविंच्या कविता झाल्यावर त्यांनी आपली कविता सादर केली, थोड्या वेळाने पुन्हा येतो असे सांगून जे निघून गेले ते परत आलेच नाहीत. अध्यक्षांशिवाय हे कवी संमेलन सुरू होते. दर्जा म्हणून ते रटाळच झाले. दोन–चार कविंच्या कविता ब–या होत्या. हे कवी संमेलन बारा वाजता मध्येच थांबवून त्या जागी बहुभाषा कवी संमेलन सुरू करण्यात आले, कारण हे जिथे ठरले होते त्या यशवंतराव चव्हाण मंडपात पुढचा नियोजित कार्यक्रम सुरू झाला होता. दुस–या दिवशीचीही अशी विस्कळीत सुरुवात झाली.



अ.भा. मराठी साहित्य संमेलन, दिल्ली

**स्पेशल रिपोर्ट**

**प्रशांत गौतम,**

**छ. संभाजीनगर**

### वैविध्यपूर्ण कार्यक्रमाची मेजवानी

या तीन दिवशीय साहित्य संमेलनात २२ फेब्रूवारी रोजी मराठी पाऊल पडते पुढे (मुलाखत), मनमोकळा संवाद–मराठीचा अमराठी संसार (परिसंवाद) लोकसाहित्य ते भूपाळी, राजकारणाचे मराठी साहित्यात उमटलेले प्रतिबिंब (परिसंवाद) मधुरव (संशोधन लेखन–जोशी, मधुरा वेलणकर)आनंदी गोपाळ (परिचर्चा) बृहन्महाराष्ट्रातील समाजजीवन, मराठी भाषा व महाराष्ट्र धर्म (परिसंवाद) झाले तर संजीवनी खेर, दत्तात्र पाष्टे, कमल पाष्टे–डायमंड पब्लिकेशन.यांचा विशेष सत्कार महामंडळ अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आला.हे अनुक्रमे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभामंडप, यशवंतराव चव्हाण सभामंडपात झाले.दि.२३ रोजी ''असे घडलो आम्ही'' –सहभाग; पृथ्वीराज चव्हाण, सुरेश प्रभू, डॉ नीलम गो–हे, (मुलाखत– राजीव खांडेकर, प्रवीण बर्दापूरकर), सामाजिक कार्य आणि मराठी साहित्य, नाते दिल्लीशी मराठीशी, अनुवाद मराठीतून इतर भाषेत किंवा इतर भाषेतून मराठीत, कृत्रिम बुध्दीमत्ता (परिसंवाद) उपरोक्त ठिकाणी पार पडले. महात्मा ज्योतीराव फुले सभामंडपात तीन दिवस कवी कट्टा धो धो बरसत होता.

> पुण्याहून दि.१९ तारखेला रवाना झालेली महादजी शिंदे विशेष रेल्वे तब्बल ३५ तासांचा प्रदिर्घ प्रवास करून सफदरगंज रेल्वे स्थानकात पहाटे तीन–साडेतीनला दाखल झाली. निवास व्यवस्थेचे स्थळ गाठण्यात दोन तास गेले. पुरेशी झोप न घेता साहित्य प्रेमी आवरा–आवरी करून सकाळी साडेनऊला संसदभवन परिसातून निघणाऱ्या ग्रंथ दिंडीत सहभागी होण्यासाठी, मराठीच्या उत्सवासाठी सामील झाले. संमेलन स्थळापासून आजूबाजूच्या परिसरात चहा–नाश्ता ही व्यवस्था उपलब्ध नव्हती; त्या मुळे संमेलनाचे भोजन मिळे पर्यंत प्रदिर्घकाळ प्रतिक्षा करावी लागली.भोजन कक्षात कुपनची गरज नाही,ही मौलिक माहिती आयोजकांनी भोजनाची वेळ टळून गेल्यावर दिली. पिण्याच्या पाण्याचीही तीच गत.संबधित प्रतिनिधीस अनेकांनी या बाबत विचारणा केली तर ''माहित नाही '' असे साचेबंद उत्तर मिळाले.निवास व्यवस्थेत समन्वय असला तरी अन्य व्यवस्थेचे मात्र तीन तेरा वाजले.
>
> संमेलनाचा मुख्य उद्घाटन सोहळा पंतप्रधानाच्या उपस्थितीत असल्याने कडेकोट सुरक्षा व्यवस्था होती.याचे वार्तांकन करणा–या प्रतिनिधींस ओळखपत्र ताब्यात घेण्यासाठी पत्रकार व निमंत्रित साहित्य रसिकांना जीवाचा आटापिटा करावा लागला.महाराष्ट्र सदन मधील काही पत्रकारांना ओळखपत्रं मिळाली, काहींचे यादीत नाव असुन मिळाली नाहीत. काही जनांना तालकटोरा स्टेडीयममध्ये मिळाली. काहींना विज्ञानभवन मध्ये ऐनवेळी मिळाली. तर काहींची तयार ओळखपत्र गठ्याने विज्ञानभवन मध्ये पडून होती.महाराष्ट्र सदन, तालकटोरा स्टेडीयम व विज्ञानभवन ही तिन्ही ठिकाणं भरपूर लांब होती. ते गाठण्यासाठी अनेकांना टॅक्सी, रिक्षा असा प्रवास करून ठिकान गाठावे लागले. या अनास्थेने अनेकांची ओळखपत्र तयार असुनही काहींनी विज्ञानभवन स्टेडीयमकडील समारंभाकडे पाठ फिरवली. त्यामुळे अनेकांनी दिल्लीत येवूनही टीव्हीवर लाईव्ह प्रसारण बघण्यास प्राधान्य दिले. सकाळी अकरा वाजेच्या सुमारास ग्रंथदिडी संमेलन परिसात दाखल झाली. साहित्य रसिकांची तोबा गर्दी होती.संमेलनाचे ओळखपत्र, किट, मिळवण्यासाठी स्वागत कक्षाच्या दालनात एकच झुंबड उडाली. विशेष म्हणजे ज्यांनी पैसे भरून आधीच नावनोंदनी केली होती अशांना ओळखपत्र व प्राथमिक सुविधा मिळवण्याठी कमालीचा संघर्ष करावा लागला.

### समारोप

मंजूर केलेले ठराव प्रत्यक्षात आणा–संमेलनाध्यक्ष भवाळकर

९८ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप सत्रात महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, लोकमत वृत्तपत्र समुहाचे अध्यक्ष खासदार विजय दर्डा, महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे, कार्यवाह डॉ.उज्वला मेंहदळे, कोषाध्यक्ष प्रकाश पागे, डी.वाय पाटील वियद्यापीठाचे कुलपती डॉ.पी.डी. पाटील, सरहद्दचे संस्थापक अध्यक्ष तथा आयोजक संजय नहार, शैलैष पगारिया, युवराज शहा आदी उपस्थित होते.

या वेळी संमेलनाध्यक्ष डॉ.तारा भवाळकर यांनी सांगितले, नव्या पिढीकडून मातृभाषेचा वापर वाढवण्यासाठी शिक्षणात मराठीचा आग्रहाने अंर्तभाव करणे आवश्यक आहे.

मराठी शाळांच्या सुधारणांसाठी आर्थिक तरतूद करण्यात यावी अशी अपेक्षा व्यक्त करून भवाळकर म्हणाल्या, भाषा ही संस्कृतीची वाहक असते. तिची निगा राखणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. चांगले ठराव झाले. ते प्रत्यक्ष आले पाहिजेत. सीमा भागात त्या त्या भाषिकांची संख्या लक्षात घेऊन द्वैभाषिक शाळा सुरू झाल्या पाहिजेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दुय्यम स्तरावरची मराठी शिकवली जाते. त्यात सुधारणा व्हावी. परदेशी भाषांप्रमाणेच भारतातील इतर भाषा शिकण्याची सोय हवी. शासनाने त्यासाठी कृतिशील पावले उचलावीत. मराठी भाषा वाढण्यासाठी घराघरातील मुले मराठीत शिकली पाहिजेत याची सर्वांनी काळजी घ्यावी. ज्ञान क्षेत्र जर समृद्ध करायचे असेल तर ज्ञानाप्रती तळमळ, आस पाहिजे. तसा समाज ज्ञानसंपन्न होतो. सीमा प्रदेशात संस्कृतीचे अभिसरण घडत असते. 'भूतां परस्परे जडो, मैत्र जीवांचे ही संत ज्ञानेश्वरांची उक्ती आत्मसात करत आपण स्नेह, प्रेम वाढवूया, अशा शब्दात त्यांनी आपल्या भावपूर्ण भाषणाचा समारोप केला.

### १२ ठराव मंजूर

रिद्धपूर येथे स्थापित मराठी विद्यापीठात नियमित कामकाज तातडीने सुरू व्हावे, त्यासाठी मनुष्यबळ व आर्थिक तरतूद व्हावी, बृहनमहाराष्ट्रातील संस्थांना आर्थिक पाठबळ द्यावे, बोलीभाषांच्या संवर्धनासाठी बोलीभाषा विकास अकादमी स्थापन करावी आदी बारा ठराव यावेळी करण्यात आले. ***






– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...

## आज्ञेच्या दबावाखाली नेहमीच राहणे प्रगतीला मारक


ज्योतिर्मय साहित्य

बालपणापासून आपल्या अंगवळणी पडलेल्या सवयीमुळे आपण अनेकदा आज्ञेच्या आधीन झालेले असतो. आज्ञेच्या अभावी आपण विचार, वर्तन अथवा व्यवहार ह्याबाबतीत काहीवेळा अनभिज्ञ असतो, अनावधानाने देखील काही करायला सुरुवात करतोच असे नाही. परंतू काहीवेळा आपल्याला आज्ञाच मिळत नाही. ही आज्ञा एखाद्या व्यक्तीकडूनच मिळावी लागते असे काही नाही, तर आपल्या ज्ञानेंद्रीयांकडून जरी मिळाली तरी कार्यकृती सुरु होऊन त्यांतून आपल्या प्रकृतीचे आणि संस्कृतीचे दर्शन घडू शकते. अनेकांच्या बाबतीत ती आज्ञा कोणाकडूनच मिळत नाही, परंतू कृती मात्र होत राहते तेव्हा त्यांतून विकृतीचे प्रदर्शन होत जाते. इतर व्यक्तीकडून अथवा स्वतःच्या ज्ञानेंद्रीयांकडून आज्ञा न मिळाल्यास आपल्यातील कृतीचा अभाव दिसू लागतो. त्याचा थेट परिणाम आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहार ह्यांच्यावर होताना आपल्याला दिसतो. आज्ञेच्या अभावाची खरेच आपल्याला जाणीव होत नसते का? आपले वैचारिक मंथन आज्ञेशिवाय होऊच शकत नाही का?

आज्ञेचा अभाव जसा काहीवेळा तापदायक ठरत असतो, तसाच आज्ञेचा प्रभाव देखील त्रासदायक ठरू शकतो, ह्याचा अनुभव आपल्यापैकी प्रत्येकाने कमी-अधिक प्रमाणांत कधीना कधी घेतलाच असणार. असा अनुभव कदाचित शाळा-महाविद्यालयांत, नोकरी-व्यवसायांत, घरांत-धंद्यांत इतरत्र कोठेही आलेला असू शकतो. प्रत्येक ठिकाणी एखाद्या अधिकारप्राप्त व्यक्तीने आज्ञा दिल्याशिवाय कार्यकृती होत नाहीत. ''मी म्हणेन तीच पूर्व दिशा'', असे म्हणणारी व्यक्ती कितीही दिशाभूल करत असली तरीही त्या व्यक्तीच्या आज्ञेचा प्रभाव इतका असतो कि, त्याच्यापुढे कोणाचेच काही चालत नाही. काहीवेळा तर नसलेल्या अधिकाराचा सुद्धा गैरवापर करण्याची प्रवृत्ती ह्यामुळे बळावत जाते. आज्ञेच्या प्रभावाखाली आणि दबावाखाली दबलेल्या प्रत्येकास सांगितल्याप्रमाणे काम करावे लागते. अर्थात तो म्हणजे तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करण्यासारखेच असते.

## ' लाभले आम्हास भाग्य...'

ज्योतिर्मय साहित्य



उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

तरी आज अशी वेळ का येते की आम्हाला म्हणावे लागते की मराठी भाषा जगवली पाहिजे, वाढवली पाहिजे ? त्याचे कारण आम्ही तिचे पुत्र आहोत, तिचे वारस आहोत, तिचे पांग आम्हाला फेडायचे आहेत हे आम्ही कुठेतरी विसरतो. वर्षभरातून एकदा मराठी दिवस आला की आम्हाला मराठीचा अभिमान उरी दाटून येतो. पण पुन्हा वर्षभर गायब ! आमच्या मुलांना आम्ही अट्टाहासाने इंग्रजी शाळेत घालतो. मराठी शाळा ओस पडत चालल्या आहेत. इंग्रजी भाषा म्हणून शिकणे आजच्या काळासाठी आवश्यक आहेच याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. पण यासाठी मातृभाषेचा बळी द्यायला हवा का याचा विचार आपण करणार आहोत की नाही ? मावशीसाठी आईचा बळी द्यायचा का ? आम्ही आमच्या मुलांना आता ' चिऊ काऊ ' नाही शिकवत.




आमचा काऊ म्हणजे आता गाय. चिऊ म्हणजे . भू भू म्हणजे कुत्रा नाही. आता डॉगी म्हटले जाते. ' आई ' म्हणुनी कोणी आईस हाक मारी, ती हाक येई कानी. पण ती हाक आता नाही येत कानी. जिकडे तिकडे ' मम्मी शब्द कानावर पडतो. इंग्रजीत प्रेताला मम्मी म्हणतात. मम्मी म्हणताना ओठ मिटले जातात तर आई म्हणताना तोंड उघडले जाते. आ होतो. केवढा मोठा फरक ! ' टी व्ही वरच्या साबणाच्या एका जाहिरातीत एक छोटी मुलगी आपल्या आईला ' मम्मी ' म्हणून हाक मारते. आणि मग ' किती सुंदर आहे. .' मम्मी सुद्धा, रॉक स्टार सुद्धा असे इंग्रजाळलेले उद्गार कानी येतात. मोबाईलवर मराठी टाइप करताना मराठीचे जे काही खून पडतात ते तर भयानकच ! ऱ्हस्व, दीर्घ तर अजून पुढचा भाग...! त्याबद्दल मी इथे जास्त बोलत नाही.

म्हणून आमच्या मुलांना आवर्जून मराठी शाळेत टाकले पाहिजे. त्यांना सुदर मराठी पुस्तके वाचायला दिली पाहिजेत. त्यांची गोडी लावली पाहिजे. आधी आपण पालकांनी लावली पाहिजे. मराठी पुस्तके विकत घेऊन वाचली पाहिजेत. मराठी बोला, मराठी चाला, मराठी खा, मराठी प्या, मराठी झोपा, मराठी जागा, मी मराठी, बाणा मराठी, जात मराठी, पंथ मराठी, धर्म मराठी असे अंतर्बाह्य मराठीमय व्हा. आता होळी येते आहे. तेव्हा असा ' असा अवघा रंग एक झाला..' पाहिजे. ती खरी होळी. असे जेव्हा होईल तेव्हा मराठी जगेल, वाचेल, वाढेल. फक्त मराठी दिन साजरा करून नाही भागणार.

सुरेश भटांच्या ओळींनी शेवट करू या
लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म पंथ जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी.

***



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## तमोगुण लक्षण


ज्योतिर्मय साहित्य

मनामधे दुष्टबुध्दी धरून जो दुसऱ्या चे कमालीचे नुकसान करतो. जो सदैव ऊन्मत व ऊर्मट वर्तन करतो. सतत कुठेतरी भांडणतंटा होत रहावा, ज्याच्या मनामध्ये सतत द्वेष पेटत असतो जो अस्थिर बुध्दीचा असतो. तो तमोगुण होय. जो भक्ती करतो त्याच्या भक्ती मध्ये विघ्ने आणतो देवालये तोडतो, सतत असुरी भावना मनमधे असते. ज्याला सत्कर्म आवडत नाहीत. चांगली फळे येणारी झाडे तोडावीत, समाजात दुही निर्माण करावी जेणेकरुन समाज अस्थिर होईल त्या वेळी अशी माणसे खुष असतात. लोकांना पीडा देणे, निर्दयी पणे वागणे,भ्रष्टाचार करणे, ब्राम्हणांना दिलेली वतने, वर्षासने, निर्वाहची साधने नष्ट करणे. हा तमोगुण होय. प्राणी मात्रांना ऊगाचच दु:ख देतो, ज्याला मोठमोठ्या चुका करण्याची सवय आहे. जो कोणी त्याला सदाचार शिकवतो पण तो कुणाचेही ऐकत नाही तो तमोगुण होय. जो आगी लावतो, शस्त्राने मारतो, पिशाच्च बाधा करतो, विष खायला देतो, मत्सराने एखाद्याचा जीव घेतो, तो तमोगुण होय. लोकांच्यात भांडणे लावून देऊन आपण फक्त मजा बघत बसतो भरपूर धनद्रव्य जवळ आहे पण अती पैशाच्या लोभापायी अजून अजून कष्ट करून धनद्रव्य जमवतो ते स्वतः साठी परमार्थासाठी खर्च न करता फक्त आणि फक्त साठवून ठेवतो त्याला हे कळत नाही की ऐक दिवस या जगातुन जाण्यासाठी येणार आहे तेव्हा हे सगळं ईथेच रहाणार आहे. हेच ज्याला समजत नाही तो तमोगुणी होय.

ज्याला धर्माचरण, स्नानसंध्या दी कर्मे न करता स्वधर्माचा विसर पडतो. कर्तव्य करत नाही तो तमोगुणी होय.

सारांशधर्माचे नितीनियमांचे पालन करा सदाचार, सद्गविवेक, सतत जाग्रुत ठेऊन समर्थाच्या आदेशाचे पालन करा तुमच्यात असलेला तमोगुण नष्ट करा. भगवंत भक्ती करा.

श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघूविर समर्थ



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नामस्मरण, शरणागती, आणि भगवत्प्राप्ती

ज्योतिर्मय साहित्य

भगवत्प्राप्तीला शरणागतीशिवाय मार्ग नाही, आणि शरणागती म्हणजे, मी कर्ता हा अभिमान नाहीसा होऊन, सर्व कर्तृत्व परमेश्वराचे आहे ही दृढ भावना होणे. नामाशिवाय इतर साधनांत कृती आहे; म्हणजे मी कर्ता या अहंकाराला वाव आहे. स्मरण हा मनाचा धर्म असल्याने त्यात कृतीचा प्रश्नच येत नाही, म्हणून त्यात अहंकाराला वाव नाही; शिवाय, स्मरण किंवा विस्मरण या दोन्ही गोष्टी आपल्या हातात नाहीत; म्हणून नामाचे स्मरण झाले तरी त्यात स्वतःचे कर्तुत्व नसते, त्यामुळे मी कर्ता ही जाणीव टिकू शकत नाही. मी नामस्मरण करतो हा शब्दप्रयोगसुद्धा बरोबर नाही, कारण नामाचे स्मरण होत असते, ते करू म्हणून जमत नाही. म्हणून शरणागतीला नामस्मरणासारखे दुसरे साधन नाही.

शरणागतीचा दुसरा अर्थ म्हणजे कायिक, वाचिक आणि मानसिक क्रिया थांबविणे. क्रिया न करणे हे कृती करण्यापेक्षा केव्हाही जास्त सोपे आहे; म्हणजेच शरणागती ही सहज साध्य वाटली पाहिजे. पण अनुभव तसा येत नाही. जी गोष्ट अत्यंत सोपी वाटते ती करायला पुष्कळदा कठीण जाते असा अनुभव येतो. एखाद्याला मोटार वेगात चालव म्हटले तर तो ते सहज करील, पण अती हळू चालव म्हटले तर ते फार कठीण असते. गीतेत भगवंतांनी अर्जुनाला तू नुसता मला शरण ये असे सांगितले आहे. देहबुद्धी गेल्याशिवाय शरणागती येत नाही. देहबुद्धी, वासना, अहंकार, ही सर्व एकच आहेत. जगातल्या वैभवाची आसक्ती आणि परमात्मप्राप्ती, या दोन्ही गोष्टी एकत्र असूच शकत नाहीत. म्हणूनच उद्धवाला श्रीकृष्णांनी एकांतात जाऊन हरिचिंतन करायला सांगितले, आणि असे केल्यानेच माझी तुला खरी प्राप्ती होईल असे म्हणाले. याचा अर्थ हाच की, जगाकडे पाठ फिरविल्याशिवाय भगवंत मिळत नाही. भगवंताच्या प्राप्तीचे नियम आणि व्यवहारातल्या वस्तू प्राप्त करून घेण्याचे नियम यांमध्ये फरक आहे. मनामध्ये वासना उत्पन्न झाली असता ती तृप्त करून घेण्यासाठी देहाची आणि वस्तूंची हालचाल करणे, हा व्यवहार होय. सूक्ष्म वासना देहाच्या साह्याने जड बनणे हे व्यवहाराचे खरे स्वरूप आहे. परंतु भगवंताचे याच्या उलट आहे. भगवंत हा अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे, त्याची प्राप्ती करून घेणे म्हणजे जडाकडून सूक्ष्माकडे जाणे होय. तेव्हा त्याचे साधन हेही जडाकडून सूक्ष्माकडे पोहोचविणारे असले पाहिजे. जड देहाशी संबंधित आणि सूक्ष्माशी निकट चिकटलेले असे साधन असेल तर ते नामच होय.

३७. अनन्यतेशिवाय भगवंताची प्राप्ती नाही; त्यातच भक्ती जन्म पावते.





विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## टॅप टॅप टॅप

ज्योतिर्मय साहित्य

आज जरा गंमत आणि फजिती मिळून गमतीची फजिती झाली. सध्या रोज नियमितपणे योगासने करण्याची सवय लागली आहे. ही आपोआप लागली नाही. अशा चांगल्या सवयी सहज थोड्याच लागतात? मग कोणी काही आपल्याला सांगू नये म्हणून काही गोष्टी आधीच मी सांगून टाकते. म्हणजे डॉ साधारण काय विचारणार याची कल्पना असते. म्हणून तोंडी परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्या प्रमाणे आधीच तयारी करुन जात असते. जसे डॉ विचारणार – रोज किती पाणी पिता?

लगेच मी सांगते ३ लिटर.
डॉ. – रोज किती फिरता?
मी – ३ किलोमीटर
डॉ – चहा घेता का?
मी – नाही.
डॉ. – व्यायाम करता का?
मी – हो.

अशी बरीच प्रश्नोत्तरे झाल्यावर डॉ.ना पण प्रश्न पडत असावा. सगळे आरोग्याच्या नियमात आहे तर तब्येत का बिघडावी? पण मला वाटते, पेशंट अशी ठराविक उत्तरे देतात हे डॉ. च्या लक्षात येत असावे. कारण हल्ली मला डॉ असे प्रश्न विचारत नाहीत. पण त्यांना जे समजायचे ते डॉ समजून घेतात.

असेच काही महिन्यांपूर्वी डॉ कडे गेले असताना त्यांनी फक्त एक लिंक दिली. आणि जॉईन करुन बघा. फायदा होईल असे सांगितले. काही दिवस मी टाळले. पण बघू तरी काय आहे? असा विचार करुन त्या लिंकने जॉईन झाले. आणि शिकवणाऱ्यांची भाषा, व्यायाम करुन घेण्याची पद्धत या मुळे सकाळी उठून व्यायाम करण्याची चांगलीच गोडी निर्माण झाली. आणि आरोग्य पण सुधारत आहे हे लक्षात आले. त्यांच्या कडून उपस्थित राहिल्या बद्दल रिमार्क येऊ लागले. पाणी प्या. काळजी घ्या. लवकर झोपा. एखादे दिवशी क्लास जॉईन केला नाही तर, . असे मेसेज येऊ लागले. आणि व्यायामाची गोडी वाढतच गेली. बरीच आसने करताना बरीच फजिती झाली. खूप वर्षे सवय राहिली नव्हती. शरीर अचानक कसे वळेल? पण चिकाटीने व्यायाम करत राहिले. व्यायाम घेणारे सांगत असतात. ''तुम्ही जॉईन केले ना ५०% काम झाले. जमेल तसे करा.मध्ये विश्रांती घ्या. पण व्यायाम करा.'' याचा परिणाम म्हणून व्यायामात सातत्य आले. तर गेले ५ दिवस प्रीसेशन मध्ये बॉडी टॅपिंग चालू आहे. आज सूचना सांगितली. ''जोरसे टॅप करो'' मग तसे सुरू केले.आणि बेडरुम मधून घाबरुन मुलगा बाहेर आला, नक्की आवाज कसला येतो? हे बघण्यासाठी. हा व्यायाम प्रकार लक्षात आल्यावर तो पुन्हा झोपला. आणि माझ्या नादात पुन्हा टॅपिंग चालू केले. पण...... थोड्या वेळात दारावरची बेल वाजली. एवढ्या सकाळी कोण आले? आणि काय घडले? असे वाटून दार उघडले. तर शेजारी एकदम घरात घुसलेच! आणि कोण आहे? काय झाले? म्हणून सगळे घर शोधले. नंतर म्हणाले, ''कसले आवाज येत आहेत? आम्हाला वाटले, कोणी तुमच्या घरात शिरून तुम्हाला मारत आहे. म्हणून तुम्हाला वाचवायला आम्ही आलो.'' त्यांना खरा प्रकार सांगितल्यावर काय प्रतिक्रिया द्यावी हे त्यांना पण कळेना. आणि मला पण विचित्र वाटू लागले. शेवटी ते म्हणाले, चांगला व्यायाम चालू आहे. चालू द्या तुमचे. हे सगळे झाल्यावर व्यायाम कसा आणि केव्हा करावा? करावा की करु नये? अशा विचाराने मन थोडे डळमळीत होऊ लागते. बरे एकदा ती सकाळची वेळ गेली की नंतर जमत नाही. अशा विचारात सकाळपासून होते. तेवढ्यात एक कुरिअर आले. मी ते घ्यावे की नाही या विचारात पडले. कारण मी तर काहीच मागवले नव्हते. कुरिअर आणणारे किती घाईत असतात. त्यांना आपली सही घेऊन जायची घाई! मग सही केली आणि पाकीट घरात आणून फोडले. तर आश्चर्याचा धक्काच बसला. कारण त्या योगासने,प्राणायाम व बरेच काही शिकवणाऱ्या टीम कडून तिसरे सरप्राइज गिफ्ट, एक सुंदर टी शर्ट अर्थात व्यायामाचा आला होता. आणि त्या टी शर्टने व्यायाम चालू ठेवण्याचा माझा निर्धार पक्का केला होता.



नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**लाङ्गुलचालनमधश्चरणावपातं**
**भूमौ निपत्य वदनोदरदर्शनं च ।**
**श्वा पिण्डदस्य कुरुते गजपुङ्गवस्तु**
**धीरं विलोकयति चाटुशतैश्च भुङ्क्ते ।।**

अर्थ – कुत्रा आपल्या अन्नदात्याच्या समोर शेपूट हालवतो. त्याच्या पायाशी रेंगाळतो. जमिनीवर झोपून तोंड, पोट दाखवितो. पण श्रेष्ठ हत्ती आपल्या अन्नदात्याकडे धैर्याने पाहतो. आणि अन्नदात्याने बरीच प्रार्थना केल्यावरच भोजन स्वीकारतो.

पाठीचा कणा नसल्याप्रमाणे वागणारी निस्तेज स्वाभिमानरहित माणसे आणि स्वाभिमानी माणसे यांच्या व्यवहारात नक्कीच फरक असणार, यात आश्चर्य ते काय? हा फरक अधोरेखित करण्यासाठी भर्तृहरींनी या श्लोकात कुत्रा आणि हत्ती यांच्या भोजनसंबंधित व्यवहाराविषयीचे उदाहरण दिले आहे.



आरोग्य संजीवनी

## हिमोग्लोबिन म्हणजे काय

ज्योतिर्मय साहित्य

हिमोग्लोबिन हे तांबड्या पेशींमधील प्रोटीन असून ते फुफ्फुसांकडून ऑक्सिजन शरीरातील उतींना पुरवण्याचे आणि उतींकडील कार्बनडॉय ऑक्साईड पुन्हा फुफ्फुसांकडे पोहचवण्याचे महत्वत्वपुर्ण कार्य करतात. पोषकतत्त्वांच्या कमतरतेमुळे रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होते. खाण्यात लोहाची कमतरता असल्यामुळे हे प्रमाण कमी होते. हिमोग्लोबिन हा रक्तातील अतिशय महत्त्वाचा घटक असून, तो आयर्न (लोह) आणि प्रोटीन (प्रथिने) यापासून बनलेला असतो.

हिमोग्लोबिन टेस्ट

रक्त परिक्षणाद्वारे हिमोग्लोबिनची तपासणी केली जाते. १० ते १५ मिनिटात पूर्ण होते. हिमोग्लोबिन कमी झाल्यास रक्तातील ऑक्सीजनच्या वहनाची क्षमता कमी होते. ज्यामुळे लाल रक्त-कणिकांची ( रक्तातील लाल पेशींची) संख्या कमी होते आणि अनीमिया होतो. जर शरीरात हिमोग्लोबिनचा स्तर भरपूर कमी असेल तर किडनी रोग, रक्ताची कमतरता, कँसर, पक्षाघात यासारखे आजार होऊ शकता. हिमोग्लोबिन कमी झाल्यामुळे चक्कर येणे, त्वचा पिवळी पडणे, सुस्ती येणे अशा समस्या येऊ निर्माण होतात.

कोणकोणत्या कारणांमुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होते..? :

– अयोग्य आहाराच्या सेवनामुळे, पोषणतत्वांच्या कमतरतेमुळे मुख्यतः आहारातील लोह, ब-१२ जीवनसत्व, फॉलिक एसिडच्या कमतरतेमुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होते.

– जास्त प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने. उदा. अपघातामुळे, शस्त्रक्रियेवेळी रक्तस्त्राव होणे, मुळव्याध किंवा मलाशयाचा कैन्सर, पोटाचा कैन्सर या विकारात रक्तस्त्राव झाल्यामुळे,

– किमोथेरपी औषधांच्या दुष्पपरिणामातून,

– किडन्यांचे विकार उद्भवल्याने, किडन्या निकामी झाल्याने रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होते.

हिमोग्लोबिन वाढविण्यासाठी काय खावे व घरगुती उपाय :


हिमोग्लोबिन कसे वाढवावे याची माहिती आत्ता जाणून घेऊया. हिमोग्लोबिन वाढविण्यासाठी बीट, काळ्या मनुका, खजूर, आंबा, पेरू, सफरचंद ही फळे खावीत. यामध्ये मोठ्या प्रमाणात लोह असते. हे रक्तातील हीमोग्लोबीनची निर्मीती करते आणि लाल रक्तकणांच्या सक्रियतेला वाढवते.

रक्तातील हिमोग्लोबिन वाढवण्यासाठीचा आहार :

हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी जास्तीत जास्त हिरव्या भाज्या खाल्या पाहिजे. या व्यतिरिक्त तीळ, पालक, दूध व दुधाचे पदार्थ, अंडी, नारळ, शेंगदाणे, गुळ, मोड आलेल्या धान्यांचा रोजच्या आहारात समावेश करा यांमुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढेल. **लेखक : डॉ. सतीश उपळकर**

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## आचरणात आणावे असे





ज्योतिर्मय साहित्य

आयुष्यात फार काळ कुणावर रूसू नये. रागाव, भांडाव आणि जमलं तर भांडण लगेच निपटून टाकावं. नाही जमलं तर तो विषय तात्पुरता किंवा कायमचा वगळून बाकी बोलणं चालू ठेवावं पण रूसवा-फुगवा अबोला फार काळ चालू ठेवू नये. आणि महत्वाचे म्हणजे ज्याला सुखी व्हायचे आहे त्याने पहिली माघार घ्यावी. गेलेले दिवस परत येत नाहीत आणि येणारे दिवस कसे येणार हे सांगता येत नाही. म्हणून कुठलाही अहंकार न ठेवता चालू वर्तमान आयुष्य हसत-आनंदात जगावं. म्हणून काही गोष्टी ह्या आयुष्य बदलून टाकतात मिळाल्या तरीही आणि नाही मिळाल्या तरीही.

लाखो क्षण अपूर्ण पडतात आयुष्याला दिशा देण्यासाठी. आपली एक चूक कारणीभूत ठरते ते दिशाहीन करण्यासाठी. किती कष्ट घ्यावे लागतात यशाचं शिखर चढण्यासाठी. क्षणभर गर्व कारणीभूत ठरतो वरून खाली पडण्यासाठी. म्हणून ताकात लोणी असेल तर चालेल पण लोण्यात ताक नसावं , कोळशात हिरा असेल तर चालेल पण हिर्यात कोळसा नसावा , पाण्यात बोट असेल तर चालेल पण बोटीत पाणी नसाव त्याप्रमाणे राजकारणात मैत्री असेल तर चालेल पण मैत्रीत राजकारण नसाव.

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

पु ल देशपांडे यांनी आपल्या रवींद्रनाथ : तीन व्याख्याने या पुस्तकात गांधीजींच्या जीवनातील एक प्रसंग सांगितला आहे. तो लक्षात घेतला म्हणजे रवींद्रनाथांच्या कवितेतली ताकद लक्षात येते. गांधीजी तसे कवितेचे रसिक म्हणून प्रसिद्ध नाहीत. ते कवितेचे किंवा गीताचे रसिक किंवा जाणकार असूही शकतील. पण आपल्याला ते माहिती आहेत ते प्रामुख्याने स्वातंत्र्यासाठी शांततेच्या मार्गाने लढा देणारे, सत्याग्रहाचे शस्त्र उपासणारे गांधीजी. गांधीजींसारख्या नेत्यांना किंवा आपलं ध्येय ज्यांच्या दृष्टीसमोर कायम आहे अशा महापुरुषांना आपल्या जीवनातील गोष्टींचा अग्रक्रम ठरवावा लागतो. कशाला प्राधान्य द्यायचे आणि कशाला नाही हे ठरवावे लागते. त्यासाठी त्यांना बरेचदा वैयक्तिक सुखाचा त्याग करावा लागतो. तसाच काही विचार करून गांधीजींनी आपली काव्यरसिकता बाजूला ठेवलेली असू शकते. पण तरीही रवींद्रनाथांच्या काही कविता या त्यांच्या जीवनाच्या आधार झाल्या होत्या.

गांधीजी १९३२ साली येरवडा येथील तुरुंगात उपोषण करीत होते. गांधीजींच्या मनाची अवस्था काहीशी निराश आणि नाजूक झाली होती. अशा त्यांच्या त्या मानसिक अवस्थेच्या काळात ७२ वर्षे वय असलेले रवींद्रनाथ त्यांना भेटायला आले. त्यावेळी गांधीजी मनामध्ये रवींद्रनाथांची कविताच आठवत होते. जणू त्या कवितेच्या शब्दांचा त्यांना आधार वाटत होता. आणि अशा त्या नाजूक क्षणी त्या महामानवाने या महाकवीला आपली ती कविता म्हणायला सांगितलं. आणि त्या महात्म्याच्या विनंतीवरून या महाकवीने चक्क ही कविता गाऊन दाखवली. त्या कवितेचे शब्द होते...

जीबॉन जॉखॉन शुकाये जाय
कोरुणाधाराय एशो ।।
शकल माधुरी लुकाये जाय गीतोसुधारशे एशो –
जीवन जेव्हा सुकुनी जाते, करुणाधारा होऊनि ये
सकल माधुरी लोपुनि जाता, गीत सुधारस होऊनि ये ।
कर्माचे आकार होऊनि मत्त झाकिती सर्व दिशा
हृदयप्रांती जीवननाथा, शान्त पाउले टाकित ये ।।

आपण जे न देखे रवी, ते देखे कवी असं म्हणतो. पण रवींद्रनाथांच्या बाबतीत तर अक्षरशः पाहणाराही रवी आणि लिहिणाराही रवी होता. त्यामुळे त्यांच्याबाबतीत बोलताना जे जे पाही रवी, ते ते लिही त्यांच्यातील कवी. हा रवी स्वयंप्रकाशित होता. त्याच्या प्रकाशात त्याची कविता उजळून निघाली आहे. त्यांच्या भक्तिगीतात ते आपल्याला धार्मिक वाटतात. ते धार्मिक होतेच पण कर्मकांडांचं अवडंबर पाळणारे नव्हते. त्यापासून त्यांची कविता मुक्त होती. त्यांची कविता कुठल्याही जातिबंधनात, धर्मबंधनात किंवा रुढीबंधनात अडकली नाही. त्यामुळे त्यांच्या कवितेवर अमुक एक अशा प्रकारची कविता असा कुठलाही शिक्का मारता येत नाही. हे त्यांच्या कवीतेचं वैशिष्ट्य आहे. आयुष्याच्या विविध टप्प्यांवर त्यांना ज्या ज्या अनुभवांनी समृद्ध केलं, ते भाव, ते अनुभव त्यांच्या कवितांतून प्रकटले. त्यांच्या कवितेत त्याप्रमाणे बदल होत गेले. कविता फुलत गेली, खुलत गेली, परिपक्व होत गेली. गीतांजली काव्यसंग्रहातील त्यांची चित्त जेथे हो भयशून्य ही अशीच एक प्रसिद्ध कविता आहे. अतिशय सुंदर अशी ही कविता. त्यात ते म्हणतात–

चित्त जेथे असेल भयशून्य आणि मस्तक असेल उन्नत
ज्ञान असेल मुक्त
किरकोळ सीमांच्या भिंतीत चिणून
जग नसेल झालेले विदीर्ण खंडित...
शब्द उमटतील सत्याच्या घनगर्भातून अन्
पूर्णत्वास पोहोचण्यासाठी अथक श्रमांचे बाहू यत्नात राहतील सतत.
विवेकाचा निवळशंख निर्झर नाही, जाणार हरवून
प्राण हरपलेल्या सवयींच्या ओसाड खडतर वाळवंटात.
तूच नेशील पुढेपुढे बुद्धीला...
उदारसंतत विचार आणि कृतीच्या मार्गावर.

# वाढदिवस... निमित्त बाबा....

**ज्योतिर्मय साहित्य**

आज माझ्या बाबांचा जन्म दिवस. माझा डॉन त्यांना बहुतेक जण एसबी म्हणतात. बाबा माझे वडील, अनेक जण त्यांना बाळ मामा म्हणून पण ओळखतात . तर काही जण काका तर त्यांना आमच्या सगळ्या काकू या हाक मारायच्या... बाळ..।

परिस्थिती कशीही असू देत कितीही अडचणी येऊद्यात आमचे बाळ काका छान पद्धतीने त्यातून मार्ग काढणार ही त्यांची खासियत.

मदतीला धावून जाणारे आणि कायम शिस्त पाळणारे आमचे बाबा.

मी मात्र कायम, बेशिस्त. काय करू....

हम..बंदे प्यार के। आम्ही बच्चन कायम...

आपल्या हातांनी, आपल्या खिशाचा विचार न करता बाळ मामांनी अनेकांचे आयुष्य सावरले, घडवले. आमच्या लहानपणी मी जे पाहिले आणि बाबाला अनुभवले ते वेगळेच. शिव शालिनी यांचे घर हे लई भारी प्रेम आपुलकी आणि माणुसकी असलेले.

आजही...ते..तसेच आहे.... आनंद, योगेश,,,, प्रीति, अपूर्वा आणि आम्ही सगळे ते जपतो.... म्हणून तर कृपा आहे प्रभूची शिवाची.

कसलीही अपेक्षा न ठेवता. बाबा आणि आई... सगळ्यांना आपुलकीने मदत करायचे, कुठे येऊ... ही मदत करायची त्यांची पद्धत.

आजही आम्ही करतोच.

त्यांचे मेव्हणे सगळे म्हणजे सगळे...... सागडे, असो, किंवा, धर्माधिकारी आमचे धामनगावकर देशपांडे असो किंवा, पित्रे असो. किंवा, देशमुख, अंबेकर असो. किंवा ते नगरचे देशपांडे हे त्यांना कायम प्रेम देणारेच..

शिव शालीन ...शालीन जोडपे सगळ्यांना केवळ प्रेम देत असत. म्हणून तर आजही त्यांना एस.बी.ना मानतात.

सुमंत तर त्यांचा मोठा मुलगाच.

एस.बी. म्हणजे उत्साहाचा स्रोत. या बडबड्या माणसाचा एस.बी. या माणसाचा आणि माझ्या

बाबांचा वाढदिवस.


एस. बी. म्हणजे शिवराम बळवंत देशपांडे.

यांचं देशपांडे कुटुंब प्रचंड विस्तारलेले आहे. हे तसे मूळचे परभणीचे पण नोकरी कामाच्या निमित्ताने परभणी पासून या कुटुंबातील सगळे सदस्य... हे वेगवेगळ्या शहरात गेले .

एस.बी.च्या वडिलांना श्री हनुमान प्रसन्न होते. म्हणून की काय आहे, देशपांडे फॅमिली, म्हणजे

ज्ञान...गुण..सागर.... सगळ्यांच्या आयुष्यावर जादू करणारा हा एस.बी. आज ९० च्या घरात पोहोचतो आहे. म्हणजे अजय, विजय, मंगल, उज्वल असूदे किंवा अरुण, किरण, बाळू, असो, व्वा नितीन प्रवीण, सलील, समीर, स्वाती, लता, किंवा, शोभा, मीरा, सविता, आशा, सुमंत, सुनीता शैयनी असू दे... हे सगळे भगवंत बळवंत यांचे देणे..

बाबांचे त्यांचे सगळे भाऊ. म्हणजे श्रीधर काका, विठ्ठल काका,



केशव काका, धोंडू काका, माझे आवडते मुरली काका आणि सगळ्या माझ्या काकू, आजही त्यांची खूप आठवण येते. ज्यांचे माझ्यावर प्रेम आणि आशीर्वाद आहेत.

त्या सगळ्याचा एकच ध्यास. बाळ.... आणि सगळ्यांचे आवडते ते, एकच नाव.. एस.बी.काका.

सगळ्यांना प्रेम देण्याचा जो शिवरामवर भार होता. याला ताकद, अन् संयम लागायचा ना... मजाक नहीं, हे... सगळं सांभाळायचं. ती, ऊर्जा, प्रेरणा देणारी आणि घर तिचा संसार सांभाळणारी.. होती शालिनी. माझी आई.

ती कोणाची आत्या तर कोणाची मावशी, कोणाची धाकटी जाऊ, कुणाची काकू, कोणाची वहिनी.. शालिनी तिने कधीही शिवराम यांचे मन दुखावले नाही. ती खूप प्रेमळ शिक्षिका होती.

तिने माझ्या बाबाला खूप सांभाळून घेतलं... ती जोडी म्हणजे.. सिमरन.. राज... दिल वाले दुल्हनिया जोडी.

आज माझे वडील एस.बी.यांचा वाढदिवस.... माझ्या हिरोचा... बाबाचा ....

म्हणून हे सगळ लिहावं वाटल...

आता माझा बाबा थकला आहे. नाही जात कुठे... कुणाकडे...।

एक आठवण सांगतो... मला बाबाने एक चक्क, एक विमान, खेळणी म्हणून आणले होते सुमंत मामाही खूप काळजी घ्यायचा माझी. तो माझी जान आहे।

आणि आता माझा योगेश्वर घेतोय भाऊ योगी. सायकली, आणि खुप काही. काही....खेळण्या....आम्हा तीन भावंडांमध्ये मी पार....आहे.

आणि ...राहणार आहेच।

बाबा आणायचे सगळं. शुभंकरसाठी मी योगेश आनंद असाच जीव काढायचो. नीलिमाचा योग नाही. त्या दोघांना माझा प्रभू छान ठेवो... आपल्या मुलांपेक्षा ही त्यांनी त्यांचे पुतणे, मेव्हणे, भाची... भाचे. या सगळ्यांना जीव लावला. म्हणून ते एस.बी.काका, सगळ्याचे....काका आणि बरेच काही...... म्हणजे माझा बाबा.

हम, जहां खड़े होते है लाइन वही से शुरू होती है..... ही स्टाइल .... एस.बी.नी कायम जपली.

म्हणून ते.... कायम माझे बच्चन.

किती लिहू....खर तर....यह आदमी... देशपांडे फॅमिली.... मधला आखरी डॉन.... आहे..... ।

यावर बाळ,....बाळ.... म्हणणारे... आता काका.. काकी नाहीत. आई पण नाही.

आज अनेक जण खूप खूप हक्काने बोलू शकतील. पण यामागे एक शक्ती खूप अदृष्य, शांत राहून काम करत होती...आणि काम करते आहे. तिचे नाव शालिनी.

शालू मावशी,... आई,..म्हेवणी.. काकू...जाऊ... माझी आई ... इथ पासून थेट.. शालिनी आजी,....

ती खरी एस.बी.ची जान होती. आणि आजही आहे. तिचा प्रवास जरी संपलेला असेल... पण... ती कायम आमच्या एस... म्हणजे .... नेहमीच.. .. शालिनी .

म्हणून ... तिच्या नावाचे अक्षर हे.... ..शालिनी...शिव रामची शालिनी. म्हणून शिव शालिनी. हे समीकरण तो जगतो आहे. हाच म्हणून तर हा शिव शालिनी योग आहे.

शालिनी.. आता नाही. ती....गेली....जरा आधी... पण तरीही शिवाने शालीनता सोडली नाही. हाच तर योग ... शिव शालीन योग...

आज हे दैवत... माझे वडील शिवराम परत एक छान आणि नव्या आयुष्याचे स्वागत करायला सज्ज आहेत.

आज त्यांचा वाढदिवस. त्यांना.....माझे आयुष्य लाभो... ही.. प्रभू कडे प्रार्थना.

बाबा.. मामा.. काका.. आणि आमचे.. सगळ्यांचे एस.बी.. मस्त... रहा.....

**तुमचा.. मिलिंद ..**

# महाराष्ट्र परिचय केंद्रात 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा



**नवी दिल्ली –** महाराष्ट्र परिचय केंद्रात 'मराठी भाषा गौरव दिन' आज साजरा करण्यात आला. परिचय केंद्राच्या ग्रंथालयात वि. वा. शिरवाडकर उपाख्य 'कुसुमाग्रज' यांच्या प्रतिमेस उपसंचालक अमरज्योत कौर अरोरा यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

शासनाच्यावतीने 'कुसुमाग्रज' यांची जयंती 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरी केली जाते. यावेळी माहिती अधिकारी अंजू निमसरकर व उपस्थित कर्मचाऱ्यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

**'मराठी भाषा गौरव दिन' आणि 'कुसुमाग्रज'**

वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांचे महाराष्ट्राच्या साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये अतुलनीय योगदान आहे. एक श्रेष्ठ आधुनिक मराठी कवी, नाटककार व कादंबरीकार म्हणून त्यांची ख्याती आहे. 'कुसुमाग्रज' या नावाने त्यांनी काव्य लेखन केले. प्रसिद्ध साहित्यिक वि.स.खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्याला ज्ञानपीठ पुरस्कार मिळवून देणारे कुसुमाग्रज दुसरे साहित्यिक ठरले.

कुसुमाग्रज यांचे एकूण २४ कविता संग्रह , ३ कादंबऱ्या, १६ कथा संग्रह, १९ नाटके आणि ४ लेखसंग्रह आदी साहित्य प्रसिद्ध आहे. १९६४ मध्ये गोवा येथे आयोजित 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'चे ते अध्यक्ष होते. १९७४ मध्ये त्यांच्या 'नटसम्राट' या नाटकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

***




# जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाची भूमिका

**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**

डॉ. विलास ढवळे म्हणाले की, शिक्षण हाच सर्व समस्यांवर उपाय आहे. मुलामुलींना उच्च शिक्षण देणे गरजेचे आहे. शिक्षण हे सर्वांगीण विकासाचे महाद्वार आहे. अध्यक्षीय समारोप करताना संतोष पांडागळे म्हणाले की, ग्रामीण भागातील समस्यांना आजच्या माध्यमांनी प्रथम प्राधान्य द्यावे. ग्रामीण लोकांना राजकीय शहाणपण आले पाहिजे. वैचारिक मतभेद व्हावेत पण मनभेदांमुळे गावचा विकास खुंटतो, हे लक्षात घेतले पाहिजे. पुन्हा योगायोग असा झाला की, जवळा देशमुख येथे पावणेदोन कोटी रुपयांच्या विकासकांना सुरुवात झाली.

सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने नांदेड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र माहूरगड येथील आनंद दत्तधाम आश्रमात तिसऱ्या राज्यस्तरीय जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाचे अध्यक्ष मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा या प्रचंड गाजलेल्या कवितेचे कवी अनंत राऊत हे होते. त्यांनी साहित्य म्हणजे विचार. सामाजिक बदलासाठी तसेच व्यवस्था परिवर्तनासाठी विचार महत्त्वाचा असतो. मानवता हा विचार आहे. हा विचार प्रसवण्यासाठी मानवताकेंद्रीत साहित्याची निर्मिती आवश्यक आहे. स्वार्थीसाठी अनेक राजकीय पक्ष एकत्र येऊन सत्ता स्थापन करत आहेत. मात्र साहित्यिकांनी कोणतीही गटबाजी किंवा राजकारण न करता एकत्र येऊन मानवतेची सत्ता स्थापन करावी, अशी भूमिका मांडली. तर माणसाची सेवा म्हणजेच मानससेवा हीच उच्च दर्जाची ईश्वरसेवा आहे, कष्टाला तथा परिश्रमालाच मोक्षाचे फळ लागते बाकी सर्व अंधश्रद्धा आहेत. माणूसच ईश्वरसाधनेच्या केंद्रस्थानी आहे असे प्रतिपादन सद्गुरू साईनाथ महाराज माहुरकर यांनी केले. साईनाथ महाराजांच्या आश्रमातच साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. ते या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. साहित्य संमेलन म्हटले की परिसंवाद, कथाकथन, गझलसंध्या, कविसंमेलन, ठराव वाचन हे सत्र असतातच. यामधूनही सामाजिक प्रबोधन होत असते. आनंदाश्रमात सर्व नेत्यांच्या मोठ्या फोटो लावलेल्या आहेत. या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने जातीधर्माच्या पलिकडे जाऊन सर्व मानवजात एकच आहे असा संदेश देता आला, हे या संमेलनाचे गमकच म्हणायला हरकत नाही. भारतीय संविधानावर एक परिसंवाद ठेवून एक सशक्त विचारमंथनही घडून आले. गझलसंध्या हा गझल सादरीकरणाचा स्वतंत्र कार्यक्रम या संमेलनाच्या माध्यमातून सुरू करण्यात आला. त्यामुळे एकापेक्षा एक सरस गझलांचे सादरीकरण होऊन रसिकांना मंत्रमुग्ध करण्याची किमया गझलकारांनी साधली.

प्रज्ञाधर ढवळे
कार्याध्यक्ष सप्तरंगी साहित्य मंडळ,
महाराष्ट्र.
मो. ९८९०२४७९५३

गेल्या महिन्यातच २७ जानेवारी रोजी चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन मुदखेड येथे आयोजित करण्यात आले होते. प्रज्ञादर्शन शिक्षण संस्था मुदखेड व सप्तरंगी साहित्य मंडळ, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील रणछोडदास मंगल कार्यालयात सप्तरंगी साहित्य मंडळाच्या चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या संमेलनास खा. अशोकराव चव्हाण, संमेलनाध्यक्ष डॉ. जगदीश कदम यांची उपस्थिती होती. समाजामध्ये अनेक विचारधारा प्रसवत असतात. तसेच लोकांमध्ये वेगवेगळ्या समजुती असतात. मात्र, काही लोक तर चुकीच्या गोष्टी समाजात पसरवत असतात. साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून लोकांना योग्य दिशा देण्याचे काम केले पाहिजे. खरे तर वैचारिक प्रबोधनासाठी साहित्य संमेलनाची आवश्यकता असते असे प्रतिपादन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांनी केले तर डॉ. जगदीश कदम यांनी मोबाईलच्या वाढत्या आक्रमणामुळे माणसामाणसातील संवाद तुटत चालला आहे. हा संवाद राहिला तरच माणूस जिवंत राहू शकेल. अन्यथा माणूसकीचा प्रवाह आटून जायला वेळ लागणार नाही. समाजाच्या बोथट होत चाललेल्या संवेदना ताज्या करणे हे साहित्याचे काम आहे आणि जनसंवाद साहित्य संमेलन ते करीत आहे. ह्या संवेदना बोथट होता कामा नये असे प्रतिपादन केले. चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि आयोजक प्रविणदादा गायकवाड, निमंत्रक प्रल्हाद हिंगोले, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे यांनी हे संमेलन एका उंचीवर नेऊन ठेवले. या संमेलनाच्या सर्वच सत्रांना भरभरून प्रतिसाद मिळाला. म्हणूनच हे संमेलन सर्वार्थाने यशस्वी झाले. यशस्वीतेसाठी सप्तरंगी साहित्य मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी दिवसरात्र परिश्रम घेतले. आज पाचवे जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन भोकर तालुक्यातील मातूळ या गावी संपन्न होणार आहे. हे संमेलन रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांना समर्पित आहे. तसेच ते चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाची फलश्रुती आहे. मातुळच्या गावकरी मंडळींनी सप्तरंगी साहित्य मंडळाच्या हाकेला प्रतिसाद देत साहित्य संमेलनाच्या आयोजनाची तयारी दर्शविली आहे. सतत संवाद साधण्याची आणि माणसं जोडण्याची प्रक्रिया सुरूच राहणार आहे. या प्रक्रियेचा अंत कदापिही होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो. धन्यवाद!

***

## दवा-खाना

# वॅक्समन आणि शॅट्झ यांचे द्वंद्व - स्ट्रेप्टोमायसिन कुणाचं अपत्य?

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार मैत्रांनो !

ग्राम स्टेनिंग मुळे आपण जीवाणूंचे वर्गीकरण ग्राम+ आणि ग्राम- असे करतो. ग्राम+ जिवाणू जांभळे/ गर्द निळे (उदा. स्ट्रेप्टोकॉकी) अन ग्राम- हे गुलाबी रंगाचे दिसतात. याशिवाय कांही जिवाणू आकाराने गोल (कॉकी) असतात तर कांही सळईसारखे (उदा.इ. कोलाय) असतात. याचा इथे अन्वयार्थ लावला तर प्रत्येक वर्गाकरता वेगवेगळी प्रतिजैविके प्रभावी ठरतात. पेनिसिलीन बहुदा सर्व गोल जिवाणू (कॉकी) यांच्यावर आणि ग्राम+ जीवाणूंवर प्रभावी होते. मात्र नंतर जसजसे शोध लागले तसतशी अन्य जिवाणूंविरूद्ध लढणारी औषधे गावली.

सेलमन अब्राहम वॅक्समन- (जन्म २२ जुलै १८८८ प्रिलुका, रशिया-मृत्यू १६ ऑगस्ट १९७३ अमेरिका) हे जन्माने यहुदी अमेरिकन होते. त्यांनी कॅलिफोर्निया विद्यापीठातून पीएच.डी. प्राप्त केली (१९१८). नंतर ते अमेरिकेतील रुट्गर्स विद्यापीठात व्याख्याते म्हणून रुजू झाले. जैवरसायनशास्त्र आणि सूक्ष्मजीवशास्त्र या विषयात त्यांना रस होता. मृदासूक्ष्मजीवशास्त्राचा अभ्यास करतांना मातीत घर करून राहणाऱ्या विविध जीवांच्या विघटनाचे त्यांनी संशोधन केले. त्यात त्यांनी ऍक्टिनोमायसीटीस या जिवाणूंचा आणि त्यांच्यापासून निर्माण होणाऱ्या बऱ्याच प्रतिजैविकांचा शोध लावला. यात स्ट्रेप्टोमायसीन, ऍक्टिनोमायसीन आणि निओमायसीन ही नांवे महत्वाची!

क्षयरोग (टीबी, यक्ष्मा, तपेदिक) हा तीव्र संसर्गजन्य आजार त्या काळी जगभर पसरला होता. फुफ्फुसांना हळूहळू पोखरून टाकणाऱ्या या रोगात जीवघेणा खोकला, थुंकीत रक्त येणे, भूक न लागणे, संध्याकाळी ताप येणे, इत्यादी लक्षणे आढळतात. वद्य पक्षात चंद्राचा जसा क्षय होतो, तसेच रुग्णाचे या आजारात होते. मात्र या चंद्राचा शुक्लपक्ष अनुभवायला रोग्याला डॉक्टरांच्या निदर्शनाखाली सतत औषधे आणि इतर काळजी घेणे अत्यावश्यक असते.



लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव


क्षयरोग बरा होऊ शकतो, कारण याच्या जिवाणूंचा निःपात करणारी बरीच प्रभावी औषधे आज उपलब्ध आहेत.

१९५० च्या आधी रोग्यांना सॅनिटोरियममध्ये, अर्थात चांगल्या प्रदूषणमुक्त हवेच्या ठिकाणी नेऊन ठेवणे हाच उपाय होता. त्यामुळे इतरांना हा रोग होण्याची शक्यता कमी व्हायची. मात्र यात रोग्याची मृत्यूपासून सुटका नसायची. वॅक्समन यांचे सर्वात महत्वाचे योगदान म्हणजे स्ट्रेप्टोमायसिन या प्रतिजैविकाचा शोध, कारण क्षयरोग निर्माण करणाऱ्या जिवाणूंविरूद्ध हे पहिले प्रभावी प्रतिजैविक होते. त्यांच्या या योगदानासाठी त्यांना १९५२ त्यांना फिजिओलॉजी/ वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले.

स्ट्रेप्टोमायसिनचे श्रेय कुणाचे? मंडळी, आपल्या हाताखालच्या सहकाऱ्याने केलेले संशोधन हे स्वतःच्या नावाने प्रकाशित करणे, इतकेच नव्हे तर त्याचा त्या संशोधनातील वाटा सपशेल नाकारणे, या गोष्टी आपल्या देशातच नव्हे तर पाश्चात्य देशात देखील झाल्या आहेत बरं कां! याचे दुर्दैवी उदाहरण म्हणजे स्ट्रेप्टोमायसिनचा बहुमूल्य शोध! अल्बर्ट इस्रायल शॅट्झ हे वयाने वॉक्समनपेक्षा जवळपास ३० वर्षे लहान! त्यांनी रटगर्समधून डॉक्टरेट प्राप्त केली. मृदासूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख सेलमन वॅक्समन यांच्या हाताखाली मदतनीस म्हणून त्यांनी पीएच.डी या उपाधीकरता त्यांनी काम केले. त्यांच्या पीएच. डी संशोधनाची परिणती म्हणजे त्यांनी स्ट्रेप्टोमायसिनचा शोध लावून त्याचे नामकरण केले (ऑक्टोबर १९४३). याउप्परही त्यांना हे श्रेय मिळाले नाही. शॅट्झ यांनी खूप खटपट करूनही स्टेप्टोमायसिनच्या शोधाचे श्रेय केवळ त्यांचे विभागप्रमुख वॉक्समन यांनी घेतले. परिणामी या शोधाचा मानाचा नोबेल पुरस्कार देखील वॉक्समनच्या नांवे जमा झाला. काळ्या मेघांना रुपेरी किनार इतकीच की या वादग्रस्त पुरस्कारामुळे जगप्रसिद्ध वैद्यकीय नियतकालिक द लॅन्सेट' ने ''शॅट्झचे योगदान ओळखण्यात अयशस्वी होणे ही एक महत्त्वपूर्ण चूक'' म्हणून नोबेल पुरस्कार समितीवर टीका केली. सद्भावना प्रदर्शित करण्यासाठी शॅट्झने १९४३ साली लावलेल्या शोधाबद्दल त्यांना १९९४ मध्ये रटगर्स विद्यापीठाचे पदक देऊन सन्मानित करण्यात आले. प्रिय मैत्रांनो, दुसऱ्याचे श्रेय लाटण्याचा हा प्रकार आपण आजही प्रत्येक क्षेत्रात अनुभवत असतो. हे सर्व लिहिण्याचा खटाटोप यासाठी केला की स्ट्रेप्टोमायसिनसोबत आपण शॅट्झचे नांव आदराने जोडायला हवे! याने वॅक्समनने केलेल्या 'सिन' वर थोडा उतारा मिळेल.

प्रतिजैविकांचीच चर्चा करू या पुढील भागात !

***




# मुलांनो, करूया नवीन संकल्प

ज्योतिर्मय साहित्य

प्रत्येक नवीन वर्ष नवे संकल्प, नवी स्वप्ने, नवी आशा घेऊन येत असते. नव्या वर्षाचे स्वागत करताना मनात काही संकल्प केले जातात. सरत्या वर्षात मनात योजलेल्या गोष्टी करायच्या राहून गेलेल्या असतात. त्या गोष्टी करण्यासाठी नवीन वर्षात मनात निश्चय केला जातो.

शालेय मुलांना नवीन वर्षात करता येण्यासारखे काही संकल्प खालीलप्रमाणे आहेत.

१. रोज सकाळी लवकर उठणे तसेच नियमितपणे व्यायाम करणे.

२. सकाळी उठल्या पासून ते रात्री झोपेपर्यंत रोज कोणत्याही आवडत्या पुस्तकाची दहा पाने वाचूया.

३. मोबाईल सारख्या गॅझेटच्या वापरावर नियंत्रण ठेवूया.

४. आपले ज्ञान अद्यायावत ठेवण्यासाठी वर्तमान पत्र वाचण्याची सवय लावूया.

५. आवडीचा छंद उदा. गायन, वादन, नृत्य, शिल्प, चित्र रेखाटन, पोहणे, मैदानी खेळ इत्यादीसाठी ठराविक वेळ काढूया.

६. आपल्या मित्र मैत्रिणी सोबत काही वेळ घालवून गप्पा मारूयात.

७. महिन्यात एखाद्या किल्यावर भटकंती करून ऐतिहासिक माहिती मिळवूया.

८. दिसामाजी काही तरी लिहित जावे याप्रमाणे दिवसभरात घडलेल्या प्रसंग किंवा घटना दैनंदिनी स्वरूपात लिहण्याची सुरुवात करुयात.

९. नियमितपणे शाळेने दिलेला गृहपाठ पूर्ण करण्याचा संकल्प करुया.

१०. आपल्या वेळेचे नियोजन करुन मिळालेला वेळ वाया न घालवता स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासासाठी वापरुया.

११. टिव्हीवरील अनावश्यक कार्यक्रम पाहण्याचा मोह टाळूया.

१२. ताण तणावाच्या प्रसंगी मन आनंदी आणि सकारात्मक ठेवण्याचा प्रयत्न करुया.





**विद्यार्थ्यांशी हितगुज**
लक्ष्मण जगताप,
बारामती
संपर्क : ९४२३२ ४९९९६







## कवितेच्या पानावर..

आम्ही स्वच्छंदी जगावे,
कामाचे ओझे न व्हावे,
जे जे वाढले नशिबी,
आनंदाने स्वीकारावे १

आज पुन्हा लेखणीने,
मिठी मारावी आकाशी,
पुन्हा व्हावी मैत्री माझी,
आनंदाच्या कवितेशी २

आज शंका नको येथे,
जे वाटेल ते लिहावे,
जे जे दाटले मनी या,
लिहुनिया रिते व्हावे ३

श्वास मी घ्यावा शेवटी,
हे लिहून झाल्यावर,
पुन्हा जमावी अक्षरे,
कवितेच्या पानावर ४

**-महेश जायभाय**

## येळं (वकुत)

वादूळची तंद्री ती
लागली त्या सांचीपाराला
यिळभराचा शिनवटा जणू
ईसावल्या शिळूप्याला.
दिस निघाला मावळतीला
वक्त कडूस्यात मिसळला.
तेंव्हाचाही तो एक वकुत
उन्हाच्या सावल्यात सरलेला.

ऐतवार, की बेस्तरवार ठाव कुणाला
गिळलेल्या आवंढयात सुखावलेला
सांडता सांडता तो उसासा न जाणू
हरवल्या आठवात गंधात दाटलेला.

**सौ. वैशाली महाडिक. सातारा**
मो. क्र. -९७६७४३७९२३

## नावं माझं ?

म्यांऊ म्यांऊ दुदू पिऊ.
नाव माझं मनी म्याऊ ।।१ ।।

सुरु सुरू पळते शेंगा शोधते
नावं माझं खारुताई ।।२।।

उधळूनी चाल धरतो ताल
नावं माझं घोडोबा ।।३।।

धाव माझी वेगवान लांबलंचक कान
नावं माझं ससोबा ।।४।।

उंच उंच माझी मान आहे मी जंगलाची शान
नावं माझं जिराफ दादा ।।५।।

सोंड माझी न्यारी वजनदार भारी
नावं माझं हत्तीबा ।।६।।

चतुरपणाचा धनी लबाडी नेहमी मनी
नावं माझं कोल्होबा ।।७।।

पावसात नाचतो पिसारा फुलवितो
नावं माझं मोरोबा ।।८।।

झप झप धावती पायं क्षणात मी दूर जायं
नावं माझं हरणोबा ।।९।।

करामतीत नंबर एक पहात राहावी माझी ऐट
नावं माझं माकडबाबा ।।१०।।

**- प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर**
**छत्रपती संभाजीनगर (९८२३११३५९४)**

## कृष्ण असतोच....

विखारी नजरां पासून
वाचवणारा कृष्ण असतोच
रक्षण करण्यासाठी तुझ्या
पाठीशी कृष्ण असतोच

जगभर पसरल्या असल्या
जरी पाशवी वृत्ती
आवर घालणारा त्यास
नक्की कृष्ण असतोच

वर्षाव जरी बाणांचा
झाला कितीही रथावर
निष्प्रभ करणारा मात्र
सारथी कृष्ण असतोच

निर्लज्ज सभेत काढत
असले ते अब्रूचे वाभाडे
वस्त्र पुरवणारा तरी तिथे
मागे कृष्ण असतोच

देवून दिलासा कोणीतरी
दुःख हलके करते
अनामिक नात्यात सुद्धा
बघ कृष्ण असतोच

**- बलराज संघई**
९४२००१५१०८
छत्रपती संभाजीनगर

## जय जय शिवशंकरा

सकललोकैकवरप्रदाय.....हरहर महादेव
सकललोकैकशंकराय.....हरहर महादेव
शाश्वयनिजावासाय.....हरहर महादेव
निराभासाय निरामयाय....जय शिवशंभो--१
निर्मलाय निर्लोभाय......जय शिवशंभो
निर्मदाय निश्चिताय......जय शिवशंभो
निरहंकराय निरंकुशाय....जय शिवशंभो--२
निष्कलंक निर्गुणाय.....ऊँ नमो:शिवाय
निष्कामाय निरूपप्लवाय.....ऊँ नमः शिवाय
निरवद्याय नियंतराय.....ऊँ नमः शिवाय
निष्कारणाय निरंतकाय...ऊँ नमः शिवाय --३
निष्प्रपंचाय नि:संगाय.....जय भोलेनाथ
नि:संगाय निद्द्वैताय.....जय भोलेनाथ
निराधाराय नीरागाय.....जय भोलेनाथ
निष्क्रोधाय निर्मलाय....जय भोलेनाथ --४
निर्भयाय निर्भेदाय......जय भोलेनाथ
निष्पापाय निर्भियाय.....जय भोलेनाथ
प्रणवस्वरूपाय सकलाय....जय भोलेनाथ
परमशांतस्वरूपाय.....जय भोलेनाथ --५
तेजोरूपाय तेजोत्तमाय....जय भोलेनाथ
सहस्रमुख, सहस्त्रबुध्दी...जय सांब सदाशिव
रूद्र भद्रावतार.....जय सांब सदाशिव
नागेंद्र कुंडल नागेंद्र हार...जय सांब सदाशिव --६
महाभैरव वृशभवाहन....हरहर महादेव
विश्वेश्वर विषविभूषण
मृत्युंजय त्रंबकेश्वराय....हर हर महादेव
गिरीभ्रमणाय सागर.....हर हर महादेव --७

**- सौ, ऊज्वला धर्माधिकारी**

## माझी अस्मिता मराठी

जिच्यात आहे समुद्राची खोली,
त्याच्या लाटांत खेळत असलेल्या
कवितांचा गूढ गंध,
जीवघेण्या बिझलीच्या धगधगीत,
आशा आणि स्वप्नांचा आलेख.

भाषेच्या लहरीत हरवलेले,
माझं मन, लहान मोठ्या गोष्टींवर
बसलेलं,
किंवा उभं राहिलेलं
तुळशीच्या देवळासमोर,
ते शब्द एकएक करून,
आयुष्याची एक नवी कथा सांगतात.

एक मातीचा गंध,
जिथे इतिहास जिवंत आहे,
नकळत सांगत जातो,
भगवान रामाची कहाणी,
धरतीच्या पायात जपलेले
स्वराज्याचे स्वप्न.

गुणगुणत्या खिडक्यांतून,
शाळेच्या तुरूंगात,
बिटा शाळेबाहेरच्या पारावर,
माझा आवाज उमठतो,
तो पहिला शब्द,
जुन्या काळातील प्रेमाने सजलेला.

काळ्या काळ्या मेघांच्या दरम्यान,
जिथे पावसाचे गाणे रुंदावते,
तिथे प्रत्येक थेंब एक ठसा आहे,
जिते स्वप्नांची रुपरेषा हसते,
आनंदाच्या बारामाही,
मराठी मातीचा गहिवर.

नदीजवळच्या सावळ्या मातीत,
बाहेरचा शेत,
चटकदार हळदीची गंध,
जिथे जीवनाचा रंग असतो,
ती धरणारे पांघरूण,
आणि शिवाजीच्या साहसाचा गर्जना.

संपूर्ण जग गाणं गात आलं,
माझी अस्मिता ह्दयात,
ती नजरेत,
त्या सृष्टीचं चांदणे,
धुक्याच्या सायंकाळी हसत,
येतो प्रत्येक क्षणी,
माझी अस्मिता मराठी!

**-सौ. जयश्री अर्जुन मुंडे**
अंबाजोगाई

## आरती नर्मदेची

जय देवी जय देवी जय नर्मदा माते.
ओवाळीतो आरती दृढ भक्तीने तुते धृ
तव उद्भव झाला देवी मेकल पर्वती
अमरकंटक नामे तीर्थ असे त्याची ख्याती
तव तटी करी तप सुर ऋषीमुनी यती
तुझा महिमा माते वेद शास्त्र पुराणे गाती १

माघ शुक्ल सप्तमीला मैया तव जन्म झाला
शिवे धाडियले देवी तुज जन कल्याणाला.
तुझ्या दर्शन मात्रे मिळे गंगा स्नानादी
पुण्य तव स्मरण मात्रे आई तिन्ही लोक धन्य २

केवळ तुझीच परिक्रमा साया नदी माजी
साऱ्या नर्मदे हर चा मंत्र हा त्रिभुवन गाजी
निधी दिनी ध्याती तुला परिक्रमावासी
हारुनी क्षुधा त्यांची लाड ही पुरविशी ३

निश्री जलदा सुखदा नर्मदा शिवकन्या कुमारी
जीवनदायिनी रेवा तु दुःख कष्ट निवारी.
निनादते खळाळते अवखळ निर्मळ वारी
शरणागत कुमार हा भवसागर तारी ४

**- कवी नंदकुमार भणंग**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून पुणे प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559